महाराष्ट्र पोलीस

# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE


जा.क्र./पोउआ/वाह/ १३०८/२०२५ पुणे दिनांक - १५/०२/२०२५

पुणे शहरातील कोथरुड वाहतूक विभागांतर्गत मेट्रो स्टेशन या ठिकाणी प्रवाशी वाहने हे संपुर्ण पदपथ व रोडचे बाजुने सकाळी पार्क करुन जातात व त्यानंतर सायंकाळी ऑफिस वर्क संपल्यानंतर मेट्रो स्टेशन येथे उतरुन वाहने घेवुन जातात. त्यामुळे दिवसभर दोन्ही बाजुस वाहने पार्क करुन जात असल्याने नमुद ठिकाणी रोडवर रिक्षा व इतर वाहने डबल पार्क करुन थांबत असतात. सदर ठिकाणी वाहतुकी करीता एकच लेन चालु राहत असल्याने रोडचे दोन्ही बाजुने होणा-या वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वारंवार वाहतुक कोंडी समस्या निर्माण होत आहे. त्या कारणास्तव वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, कोथरुड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. "सदर ठिकाणी यापर्वी काही पार्किंग संदर्भात आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे".

## कोथरुड वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **वनाज मेट्रो स्टेशन, आनंदनगर मेट्रो स्टेशन, आयडीय कॉलनी मेट्रो स्टेशन व नळ स्टॉप मेट्रो स्टेशन रोडवर व मेट्रो स्टेशन पासुन ५० मीटर पर्यंत दोन्ही बाजूस 'नो पार्कीग' झोन करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –१५/ २/२०२५ ते दिनांक –१ /३ /२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
 २/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.
 ३)**पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
 २/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
 ४) **प्रभारी अधिकारी कोथरुड** वाहतुक विभाग, पुणे शहर.
 २/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**
 ५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
 २/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.
 ६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
 २/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.